# भारताचे परिवर्तन

**सुसंगत शिक्षण आणि**
**व्यावसायिक प्रशिक्षण यांच्या मार्फत**
**भारतीय जनतेचे सबलीकरण करण्याच्या मार्गाने.**



**हे पुस्तक खालील क्षेत्रांसाठी समर्पित आहे:**

१. ३५ वर्ष पर्यंतच्या वयाचे तरूण ........ ८५० दशलक्ष
२. एमएसएमईमध्ये काम करणाऱ्या व्यक्ती ........ ४६० दशलक्ष
३. १४ ते ५५ वर्ष वयाच्या नोकरी नसलेल्या व्यक्ती ........ ३०० दशलक्ष

*i Watch* **आता १२ भाषा + इंग्रजी** द्वारे भारतातील २८ राज्ये आणि ६ केन्द्रशासित प्रदेशामध्ये पोहचत आहे.



# भारताचे परिवर्तन

**सुसंगत शिक्षण** आणि **व्यावसायिक प्रशिक्षण**
यांच्या मार्फत भारतीय जनतेचे
**सबलीकरण** करण्याच्या मार्गाने

कृष्ण खन्ना
यांच्याद्वारे

सहाय्यकर्ते

TIMES FOUNDATION
THE TIMES GROUP

Sundaram®
Education Revolution

शीतल प्रिन्ट्स, २११, प्रगती इण्डस्ट्रीयल इस्टेट, डॉ. एन. एम. जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई – ४०० ०११ यांनी भारतामध्ये छपाई केली.

भारतातील प्रकाशक मॅनिफेस्ट पब्लिकेशन्स, ३०८, ऑलिम्पस, अल्टामाऊंट रोड, मुंबई – ४०० ०२६ भारत यांनी भारतात प्रकाशित केले.

कॉपीराइट ©कृष्ण खन्ना २०१२

भारतात पहिल्यांदा प्रकाशन १९९३

आयएसबीएन ९७८–८१–९०६६२१–०–९

भारताचे परिवर्तन हे पुस्तक *i Watch* यांनी पहिल्यांदा १९९३ मध्ये प्रकाशित केले आणि त्यानंतर सध्याच्या आवृत्तीपर्यंत त्यामध्ये सुधारणा होत गेली व ते वाढविण्यात आले. तपशील ह्या पुस्तकाच्या पृष्ठ ८ वर पहा. या शिवाय हे पुस्तक हिंदी, उर्दू, पंजाबी, आसामी, ओरिया, बंगाली, गुजराथी, मराठी, तामिळ, मल्याळम, कन्नड आणि तेलगू अशा इतर १२ भारतीय भाषांमध्ये देखील छापले गेले.

शीतल प्रिन्ट्स, २११, प्रगती इण्डस्ट्रीयल इस्टेट, डॉ. एन. एम. जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई – ४०० ०११ यांनी भारतामध्ये छपाई केली.

भारतातील प्रकाशक मॅनिफेस्ट पब्लिकेशन्स, ३०८, ऑलिम्पस, अल्टामाऊंट रोड, मुंबई – ४०० ०२६ भारत यांनी भारतात प्रकाशित केले.

**कॉपीराइट आणि पुनर्मुद्रण**

मजकूर, ग्राफिक्स, लोगो, प्रतिमा, आकडेवारीचे एकत्रीकरण यासारखा ह्या पुस्तकातील संपूर्ण आशय ही *i Watch* च्या बरोबरीने इतर माहिती पुरवठादारांची देखील संपत्ती आहे. ह्या पुस्तकाची किंवा ह्यातील कोणत्याही भागाची पुनर्निर्मिती, प्रत काढणे, पुन:प्रकाशन प्रसार करू नये किंवा याचा गैरवापर केला जाऊ नये. *i Watch* च्या पूर्व परवानगी आणि लेखी सहमती शिवाय यांत्रिक किंवा इलेक्ट्रॉनिक अथवा अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे हा मजकूर प्रसारित करता येणार नाही.

# भारताचे परिवर्तन

## **सुसंगत शिक्षण** आणि **व्यावसायिक प्रशिक्षण**
## यांच्या मार्फत भारतीय जनतेचे
## **सबलीकरण** करण्याच्या मार्गाने

१. **हे एक पुस्तक आहे मासिक नव्हे.** वाचण्यास सुलभ व्हावे म्हणून खास मासिकासारखे तयार केले आहे. २०० पानांचे पुस्तक वाचायला फारच कमी लोकांना आवडते!

२. हे पुस्तक आणि हे कार्य **भारतातील युवकांसाठी** आणि एसएमईज्मध्ये काम करणारे ४६० दशलक्ष लोक आणि तरूणांच्या, विशेषत: **स्त्रिया आणि मुलींच्या सबलीकरणासाठी** कार्य करणाऱ्या स्त्रिया व पुरुष यांच्यासाठी आहे.

३. ह्या पुस्तकातील आशियाचा संदर्भ समजण्यासाठी आणि जाणून घेण्यासाठी ह्या पुस्तकातील **पृष्ठ–७** आधी वाचले पाहिजे, कारण हे पृष्ठ म्हणजे आमच्या **प्रयत्नांचे सार–तत्त्व आहे**.


४. ह्या पुस्तकाच्या प्रगतीचा इतिहास, **पृष्ठ–८**

५. अमर प्रेरणा, **पृष्ठ–९**

६. नागरिकाचे प्रयत्न, **पृष्ठ–१०**

७. पुस्तकाचा हेतू, **पृष्ठ–१०**


ह्या पुस्तकाच्या मुख्य भागात प्रवेश करण्यापूर्वी तुम्ही वरील ७, ८, ९ आणि १० ही पृष्ठे आधी वाचावित असे सुचविण्यात येत आहे.

# अनुक्रमणिका


अनुक्रमणिका २
प्रस्तावना ४
आर्थिक विकास टिकविणे ७
ह्या पुस्तकाच्या प्रगतीचा इतिहास ८
अमर प्रेरणा ९
नागरिकाचे प्रयत्न आणि ह्या पुस्तकाचा हेतू १०
आम्ही तुमच्यासाठी काय करू शकतो ? ११
*i Watch* च्या प्रकाशझोतातील क्षेत्रे १२
*i Watch* बाबत नागरिकांच्या प्रतिक्रिया १४
*i Watch* विषयी १६
तत्त्व, ध्येय, उद्दिष्ट्ये १८


## विभाग १ शासन


भारत जो तुम्हाला माहितच नाही १९
भारताच्या परिवर्तनासाठी कार्यक्रमपत्रिका २१
आर्थिक व व्यापारविषयक सुधारणा २३
शासन आणि प्रशासन २४
भारत देश २५
चांगला राज्यकारभारच भारताचे एका महाशक्तीत रूपांतर करू शकेल २६
उत्तम शासन + प्रभावी प्रशासन = शून्य भ्रष्टाचार २७
जागतिक दर्जा मिळविण्यासाठी कठोर परिश्रमाची गरज असते २८
जागतिक दर्जाची कार्यक्षमता कशी मिळवाल ? ३१
जागतिक शासन आणि जागतिक शांतता ३३


## विभाग २ शिक्षण आणि मनुष्यबळ विकास


१९४७ नंतरची तीन देशांची कहाणी ३४
शिक्षणाचे महत्त्व ३५
४०–६० तासांमध्ये कोणतीही भारतीय भाषा लिहिण्यास आणि वाचण्यास शिका ३६
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण व्हीईटी – हमखास विजेते ! ३७
उद्योजकता कौशल्यविकास, इएसडी आणि व्यावसायिक शिक्षण, व्हीईटी ३९
भारतातील 'शिक्षणाचा साचा' (मॅट्रिक्स) ४१
भारताला उच्च व तांत्रिक शिक्षणातील एक आंतरराष्ट्रीय गुरूकुल बनवा ४३
भारत एक ज्ञानाधिष्ठीत अर्थव्यवस्था बनविणे ४४
लोकसंख्यारूपी बॉम्बचा फ्यूजच काढला पाहिजे ४७
भारतातील विरोधाभास ४९
तरूणांच्या सबलीकरणासाठी तीन प्रस्ताव ५१
तरूणांचे समुपदेशन – मी कोण आहे ? ५२

## विभाग ३ अर्थव्यवस्था आणि उद्योजकता


गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी ५६
खरा आणि वास्तव भारत ५७
दारिद्र्य रेषा आणि संबधित आकडेवारी ५८
जागतिक बाजारपेठेसाठी नियोजन कसे करावे ? एक तपासणी ५९
एमएसएमइज् – कोणत्याही अर्थव्यवस्थेचा कणा ६१
भारताने आंतरराष्ट्रीय व्यापाराचे केंद्रस्थान बनले पाहिजे ६३
भारतीय अर्थव्यवस्थेचे जीडीपी विश्लेषण.... एसएमइज्चे महत्त्व ६५
चीन – भारत यांची तुलना करणारा तक्ता – हिंमत असल्यास आम्हाला गाठा ६६
जग, यूएसए, बीआरआयसी, निवडक देश ६७


## विभाग ४ रोजगार निर्मिती


शिक्षण आणि कौशल्य यांचे महत्त्व ६८
मनुष्यबळ विकास–रोजगार आणि बेरोजगार ६९
भारतातील ‘रोजगाराचा साचा’ ७०
एसएमइज्द्वारे रोजगार निर्मिती ७२
एसएमइज्ची वर्गवारी, यूएस–एसबीए गटवारी ७३
व्हीईटीद्वारे रोजगार निर्मिती ७५
व्हीईटी अभ्यासक्रम वर्गवारी आणि प्रशिक्षण यांची वर्गवारी, अभ्यासक्रम ७६
रोजगार निर्मितीसाठी व्हीईटीची अंमलबजावणी ७९
शिक्षण आणि व्हीईटीक्षेत्रामध्ये वापरलेल्या व्याख्या ८२
न्यावसायिक प्रशिक्षण, व्हीईटी आणि चीनमधील अर्थव्यवस्था ८३
न्यावसायिक प्रशिक्षण, व्हीईटी आणि जर्मनी (इयू) मधील अर्थव्यवस्था ८४
न्यावसायिक प्रशिक्षण,व्हीईटी आणि यूएसमधील अर्थव्यवस्था ८५
न्यावसायिक प्रशिक्षण, व्हीईटी आणि भारतामधील अर्थव्यवस्था ८६
भारताची कामगार उत्पादकता ८७
सुसंगत शिक्षण आणि प्रशिक्षण ८८
शेती : भारताच्या दृष्टीने जमेची बाजू ९०


## सर्वसाधारण


सर्वसाधारण माहिती ९१
संदर्भ ९२
राष्ट्रीय समित्यांमध्ये *i Watch* ९३
ह्या पुस्तकात वापरलेली संक्षिप्त रूपे ९४
१३ भाषांमध्ये उपलब्ध *i Watch* ची प्रकाशने ९५
जीडीपी वाढीचा दर १०% ते १५% होण्यासाठी कृतीयोजना ९६
२०१४–२०१५ साठी *i Watch* ने आखलेले प्रकल्प ९७
प्रायोजक ९८
*i Watch* चे सीएसआर प्रकल्प १००
लेखकाविषयी १०१
सर्वसमावेशक वृद्धीचा मंत्र १०२

# प्रस्तावना

ह्या पुस्तकाची रचना भारतातील नागरिकांना फायदा व्हावा अशा पद्धतीने करण्यात आली आहे. उदा. राजकारणी, शेतकरी, अधिकारी वर्ग, व्यावसायिक, शिक्षक, विद्यार्थी, विद्वान, डॉक्टर, व्यापारी, गृहिणी, इंजिनिअर्स, वकील, सल्लागार, एनआरआय, पीआयओ आणि भारतातील तरूण पिढी.

**हे पुस्तक आहे,** मासिक नव्हे. याची शैली सहज वाचन व्हावे यासाठी सुलभ व मैत्रीपूर्ण आहे. बरेचसे लेख एक किंवा दोन पानांचे आहेत. फारच थोडे लेख ३ पानांचे आहेत.

अत्यंत आवश्यकता नसेल तर अनावश्यक मजकूर शक्य तितका कमी करता यावा यासाठी मजकुराला सुलभ आराखड्यांची आवश्यक ती जोड देण्यात आली आहे.

ह्या पुस्तकातील साहित्य चार भागात विभागण्यात आले आहे. प्रत्येक पानावरील तळटीप लेखाची वर्गवारी दाखविते. जेथे जेथे शक्य आहे तेथे ह्या विचारांमधील आंतरप्रवाह ठळक करण्यात आला आहे.

**विभाग – १** मध्ये **प्रशासन** विषयक लेख आहेत.

**विभाग – २** मध्ये **मनुष्यबळ संवर्धन** आणि **शिक्षण** याविषयी लेख आहेत.

**विभाग – ३** मध्ये **अर्थव्यवस्था व उद्योग** यातील निवडक क्षेत्रावर लेख आहेत.

**विभाग – ४** मध्ये **रोजगार निर्मिती विषयी** लेख आहेत.

हे पुस्तक इयत्ता ८ वी आणि त्यापुढे शिक्षण घेतलेल्या सर्वांसाठी आहे.

सर्व भारतीयांपैकी जेमतेम फक्त ७% लोकांनाच इंग्रजी खरोखर समजत असल्यामुळे हे पुस्तक मराठी, गुजराती, उर्दू, हिंदी, तामिळ, तेलगू, कन्नड, मल्याळम्, ओरिया, बंगाली, आसामी आणि पंजाबी अशा सर्व प्रमुख भारतीय भाषांमध्येही उपलब्ध करून देण्यात आले आहे.

येथे दिलेली माहिती शक्य असेल तेथे सध्या उपलब्ध असलेली माहिती वापरून नवीकरण करण्यात आली आहे.

वाचकांनी ह्या पानांचा, भारतातील जनतेच्या विचार आणि कृती यांना चालना देण्याच्या ज्या प्रेरणेने ती लिहिली गेली आहेत, त्या पद्धतीने विचार करावा अशी विनंती. हे काही धर्मोपदेशकाचे व्याख्यान नाही तर केवळ **भारतातील जनतेला लाभ होण्याच्या हेतूने** यापुढे देशामधील जागृती आणि कृती यांना प्रेरणा देण्यासाठी मांडलेले वस्तुस्थितीचे कथन आहे.

यातील प्रत्येक नोंद 'स्वतंत्र' आहे. त्यापैकी कोणतीही केव्हाही वाचता येऊ शकते.

जर तुम्ही मला भारतीय जनतेला जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी लक्ष घालण्याची गरज असणाऱ्या पाच अत्यंत महत्त्वाच्या विभागांचा निर्देश करण्याबाबत थेट प्रश्न विचारलात तर मी म्हणेन शिक्षण, शिक्षण, शिक्षण, प्रशासन आणि प्राथमिक आरोग्यसेवा.

यातील **पहिले 'शिक्षण'** हे कार्यक्षम साक्षरता आणि पूर्व–प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शिक्षण व्यक्त करते. 'शिक्षणाच्या अधिकाराचा कायदा' हा संसदेमध्ये आता २००५ मध्ये सादर करण्यात आला आणि तो २००९ मध्ये मंजूर करण्यात आला. स्वातंत्र्यानंतर ६३ वर्षानंतर आपल्याला शिक्षणाचे महत्त्व समजले, ही परमेश्वराची कृपाच म्हणायची!

यातील **दुसरे 'शिक्षण'** व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण (व्हीईटी) व कौशल्यनिर्मिती व्यक्त करते. व्हीईटीचे महत्त्व अखेर पंतप्रधानांच्या पातळीवर मान्य करण्यात आले असून त्यांनी नोव्हेंबर २००६ मध्ये तरूण भारतीयांना सबलीकरण आणि प्रशिक्षण याद्वारे उत्पादक रोजगाराच्या टप्प्यापर्यंत आणून ठेवण्यासाठी एका दक्षता दलाची उभारणी केली आहे.

११व्या योजनेच्या कालामध्ये सन २००९ मध्ये **नॅशनल स्किल कौन्सिल** आणि **नॅशनल स्किल्स डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन** यांची उभारणी करण्यात आली. भारत सरकारने ११व्या योजनेमध्ये अतिरिक्त १५०० आयटीआय/आयटीसीज् व ५०,००० कौशल्य केंद्रांची योजना आखली आहे. या शिवाय वर्तमान ५,५०० आयटीआयज्चे आधुनिकीकरण देखील पूर्ण वेगात सुरू आहे.

**तिसरे 'शिक्षण'** सर्वप्रकारच्या सर्वप्रकारचे वैद्यकीय, उच्च आणि तांत्रिक शिक्षण नियंत्रण विरहीत व नियममुक्त करण्याची अभिव्यक्ती करते. असे केल्यानेच नावीन्य आणि गुणवत्ता याची निर्मिती होऊ शकते आणि आपण वर्ल्ड क्लास (जागतिक दर्जाचे) बनू शकतो.

आपण स्टील, सिमेंट, कार्स, स्कूटर्स इत्यादी बाबतीत खूप मर्यादेत होतो, केवळ वाढलेली क्षमता आणि मुक्त बाजारपेठ यांच्या जोरावरच किंमत, दर्जा आणि उपलब्धता यांचे प्रश्न निकालात निघाले आहेत. सर्व प्रकारच्या शिक्षणामधील, विशेषत: उच्च, वैद्यकीय आणि तांत्रिक शिक्षणामधील **'लायसन्स राज'** नष्ट झाले पाहिजे.

एक उद्योग म्हणून पाहता माहिती तंत्रज्ञान आणि सॉफ्टवेअर यांच्यापेक्षा शिक्षण जवळजवळ ५ पट मोठे आहे. त्यामुळेच सॉफ्टवेअर आणि आयटीपेक्षा ते फार मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करते.

**प्राथमिक आरोग्य** सेवांच्या विभागातील माहिती आणि उपाययोजना यासाठी वाचकांना इतरत्र माहिती मिळवावी लागेल.

वाईट प्रशासन आणि त्याचे होणारे नकारात्मक परिणाम यांची बरीच उदाहरणे देऊन **उत्तम प्रशासन** ही गोष्ट अधोरेखित करण्यात आली आहे. मतदाराला सुसंगत शिक्षणाद्वारे सबल केले जाईपर्यंत लोकशाहीमध्ये उत्तम प्रशासन असणे कठीणच आहे म्हणूनच सुसंगत शिक्षणावर भर दिला जात आहे.

सूक्ष्म आणि लहान मध्यम उद्योग **(एमएसएमईज्)** यांची खरी क्षमता लक्षात येण्यासाठी आपल्या देशाच्या स्वातंत्र्याची **६३** वर्षे आणि बऱ्याचशा चर्चा/वादविवाद खर्च झाले. एमएसएमईज् विषयीचे बील आता २००६ मध्ये मंजूर झाले. आपल्या जीडीपी पैकी जवळजवळ ८०% इथेच तर असतो!

भारतासह ह्या संपूर्ण जगातील ९९.७% संस्था एमएसएमईज् आहेत. कोणत्याही राष्ट्राचा खरा 'उर्जा स्त्रोत' आणि 'श्वासोच्छश्वास' हाच असतो. आपल्या ४९० दशलक्ष लोकांच्या कामगार शक्तीपैकी फक्त ६% 'संघटीत क्षेत्रात' आहेत आणि उरलेले ४६० दशलक्ष किंवा ९४% 'असंघटीत क्षेत्रात' आहेत. एमएसएमईज्ची एकूण संख्या १०० दशलक्ष असावी असा अंदाज आहे. त्यातील ८०% कृषी व बागायती क्षेत्रामध्ये आहेत तर उर्वरीत २०% ह्या सेवा आणि निर्मिती क्षेत्रामधील आहेत.

रोजगार निर्मितीमधील व्हीईटीज् आणि एमएसएमईज्चे महत्त्व आधोरेखित करण्यात आले आहे व समजावून सांगण्यात आले आहे. सगळ्यात अलिकडील सीआयआय – बीसीजी – प्रो.सी.के. प्रल्हाद प्रॉजेक्ट **भारत @ ७५** अनुसार राष्ट्राला सन २०२२ पर्यंत ५०० दशलक्ष जागतिक दर्जाच्या कुशल व्यक्तिंची आणि २०० दशलक्ष जागतिक दर्जाच्या पदवीधरांची आवश्यकता आहे.

ह्या पुस्तकाच्या प्रगतीचा इतिहास नाट्यपूर्ण आहे. तपशीलासाठी कृपया पृष्ठ क्रमांक ८ पहा.

**सातत्याने टिकून राहणारी गोष्ट बदल हीच आहे.** तो चांगल्यासाठी का वाईटासाठी झाला हे ठरविणे तुम्हा वाचकांच्या हाती आहे!

कृष्ण खन्ना
*मुंबई, भारत*
एप्रिल, २०१४

**दावा फेटाळणे**

ह्या पुस्तकात नमूद करण्यात आलेली माहिती गेल्या १७ वर्षांमध्ये भारतातील आणि बाहेरील विविध स्त्रोतामधून गोळा करण्यात आली आहे.
देण्यात आलेल्या माहितीच्या अचूकतेबाबत *i Watch* कोणतीही जबाबदारी स्वीकारीत नाही.
ह्या पुस्तकात देण्यात आलेल्या माहितींच्या आधारे गुंतवणूक आणि व्यावसायिक निर्णय घेतले जावेत अशी शिफारस आम्ही करीत नाही.
बरेचसे माहितीचे स्त्रोत तसेच संदर्भ यांचा तपशील पृष्ठ ९२ वर देण्यात आला आहे.
सगळ्यात अलिकडील आकडेवारी व माहिती यासाठी वाचकांनी पृष्ठ ९२ वर नमूद केलेल्या वर्तमान वेबसाईट्स आणि हॅण्डबुक पहावे असा सल्ला दिला जात आहे.

**भारतातील सन्माननीय नागरिक**
पुरुष, स्त्रिया आणि बालकांसाठी

# सर्वसमावेशक वृद्धीचा मंत्र : मानवी संपत्तीवर *लक्ष केंद्रित करा.*

प्रिय मित्रांनो,

आम्ही एक कौटुंबिक निधी पुरवठा असणारे २१ वर्ष जुने एनजीओ आहोत आणि राज्यकारभार, शिक्षण, अर्थव्यवस्था आणि रोजगार या क्षेत्रांमध्ये कार्य करतो. **'भारताचे परिवर्तन'** या माझ्या पुस्तकाची प्रत आमच्या वेबसाइटवर www.wakeupcall.org वरुन विनामूल्य डाऊनलोड करता येऊ शकेल. मला जर्मनी आणि जपान या देशांमध्ये ६ यर्ष काम करण्याचे सद्भाग्य लाभले होते आणि ह्या दोन्ही देशांचा दुसऱ्या जागतिक युद्धात विनाश झाला होता. त्यांच्याकडे कोळसा, तेल किंवा नैसर्गिक वायू यांच्या स्वरुपातील उर्जा किंवा खनिज संपत्ती नाही. ही वस्तुस्थिति असून देखील ते देश जगातील २ऱ्या आणि ३ऱ्या क्रमांकाच्या सर्वात मोठ्या अर्थव्यवस्था म्हणून उदयास आले आहेत. आकारमानाने ते भारताच्या फक्त १२% एवढेच आहेत. **पण त्यांच्याकडे उच्च दर्जाची मानवी संपत्ती आहे.** हेच तर त्यांचे रहस्य आहे. हीच गोष्ट चीन, दक्षिण कोरिया, तैवान, हाँगकाँग, सिंगापूर, मलेशिया आणि जपान यासारख्या आशियाई वाघांना देखील लागू होते.

माझ्या उद्योगातील ३१ वर्षांच्या आणि सामाजिक क्षेत्रातील २० वर्षाच्या अनुभवाच्या जोरावर मी नम्रपणे नमूद करतो की आधीच्या सरकारने भरपूर काम केलेले आहे परंतु खालील मुद्यांवर लक्ष केंद्रित केल्यास ते आणखी बरीच प्रगती करू शकतात.

१. **केंद्र सरकारच्या सर्व वेबसाईट्स १२ प्रमुख भारतीय भाषांमध्ये परिवर्तित करणे.** भारतातील प्रांतीय प्रसारमाध्ये ही इंग्रजी प्रसारमाध्यमांपेक्षा २० पट जास्त मोठी आहेत आणि असे केल्यास जास्त लोकांना शासनाचा विचार समजू शकेल आणि ते त्याच्यासोबत काम करू शकतील. (फक्त ६% भारतीयांना इंग्रजी समजते हे आमचे एनजीओ १२ भारतीय भाषांमध्ये लिखाण प्रसिद्ध करतात) आयएनएस, इंडियन न्यूजपेपर सोसायटी हॅन्डबुक, रफी मार्ग, नवी दिल्ली यांचे माहितीपुस्तक तुम्हाला अधिक माहिती देऊ शकेल. गुगल, ओरॅकल आणि मायक्रोसॉफ्ट देखील जवळपास ९ ते १५ भारतीय भाषांमध्ये काम करतात. भारतीय राज्यघटना २२ भाषांना पाठिंबा देते.

२. **पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणावर लक्ष केंद्रित करणे.** अगदी ६५ वर्षे उलटून केली तरी जवळपास ६५% भारतीय निरक्षर आहेत. (आमचा अंदाज, कृपया यूएनडीपी कडे देखील तपासून पहा) लोकांना साधे लिहिता वाचताही येत नसेल तर गरीबी कमी होणे शक्य नाही. मानवी मेंदूपैकी ९०% भागाचा विकास ६ ते ७ वर्षे वयापर्यंत होत असतो. त्यामुळे पूर्व प्राथमिक शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे.

३. **उद्योजकता कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करा.** इयूमध्ये याची सुरुवात इयत्ता १ पासून होते. भारतामध्ये आपण इयत्ता ८ किंवा उच्च माध्यमिक शाळेपासून तरी याची सुरुवात केली पाहिजे. तुम्ही स्वयंरोजगारावर असा किंवा दुसऱ्यांची नोकरी करीत असा, ही गुणवत्ता अत्यंत महत्त्वाची आहे. **जवळजवळ ५८% भारतीय स्वयंरोजगारावर आहेत. उद्योजकता कौशल्यविकासामुळे शिकणाऱ्यांच्या एसक्यू आणि इक्यूमध्ये वाढ होते.**

४. **कौशल्ये, व्यवसाय प्रशिक्षण आणि रोजगार निर्मिती योजनांवर लक्ष केंद्रित करा.** भारतामध्ये (लोकसंख्या १२१० दशलक्ष) ९५०० व्हिइटि (व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण) केंद्रे आहेत. स्विट्झरलॅण्डमध्ये. (लोकसंख्या ८ दशलक्ष) ६०००, जर्मनीमध्ये (लोकसंख्या ८२ दशलक्ष) १००,००० आहेत; जपानमध्ये (लोकसंख्या १२९ दशलक्ष) १,५०,००० आहेत. चीनमध्ये (लोकसंख्या १३५० दशलक्ष) ५,००,००० आहेत. लॉर्ड मॅक्ले यांनी १८३५ मध्ये भारतातील सर्व गुरुकुल **केंद्रे** बंद केल्यापासून देशातील कौशल्य आणि व्यवसाय निर्मितीच्या पायाभूत सुविधांचा आपल्याकडे तुटवडा आहे. **व्हिइटी मुळे एसक्यू आणि इक्यू यांच्यामध्ये सुधारणा होते.**

५. **नॅशनल नॉलेज कमिशनच्या सॅम पित्रोदा यांच्या शिफारशींची अंमलबजावणी करा.** एनकेसीने **उच्च, तांत्रिक, वैद्यकीय, शेतकी** शिक्षणाच्या भारतातील सर्व प्रकारांबाबत अत्यंत वैध सूचना केलेल्या आहेत. या सूचनांची शक्य तितक्या लवकर अंमलबजावणी करण्याची गरज आहे. आज कोणत्याही भारतीय महाविद्यालय किंवा विद्यापीठ यांचा जगातील सर्वश्रेष्ठ २५० मध्ये क्रम लागत नाही. आपण ज्या मार्गाने जात आहोत त्याचा विचार करता १० वर्षानंतर आपला जगातील श्रेष्ठ ५०० युनिव्हर्सिटीमध्ये देखील समावेश होणार नाही. **फक्त स्पर्धा आणि मुक्त बाजारपेठा यांच्यामुळे शैक्षणिक संस्थांना शोध संशोधन करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय मानकांच्या दर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी चालना मिळू शकते.** विद्येची देवता असणाऱ्या सरस्वतीला बंदिस्त करून बेड्यांमध्ये जखडण्यात आले आहे, तिला मोकळे करण्याची गरज आहे.

६. **शिक्षण, तंत्रज्ञान , व्यावसायिक प्रशिक्षण आणि उद्योजकता कौशल्य यावर आयवॉचने सुचविलेल्या उपाययोजना. उद्योजकता कौशल्याविकास आणि व्यावसायिक प्रशिक्षण** यांच्या सर्वप्रकारच्या शैक्षणिक व प्रशिक्षणात्मक उपाययोजनांसाठी (@ रु **२ दर तास** एक वेळेस एकावर लक्ष केंद्रित करून) परस्पर संवादी दूरशिक्षणासाठी **(@ रू १०० दरवर्षी प्रत्येक विद्यार्थ्यास शालेय शिक्षणासाठी)** आम्ही भारतामध्ये विकसित केलेली कमी खर्चाची उच्च तंत्रज्ञान असणारी तंत्रज्ञाने सादर करीत आहोत. तपशीलासाठी पृष्ठ १०० वरील आमची सीएसआर नोंद पहा.

# सुसंगत शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यांच्याद्वारे आर्थिक विकास टिकवून ठेवणे.

जोपर्यंत आपण भारताचा विचार करीत आहोत तोपर्यंत आपल्याला वरील मुद्यावर सातत्याने कार्य करणे गरजेचे आहे.

खाली दिलेली दोन उदाहरणे **मनुष्यबळ विकास, सुसंगत शिक्षण** आणि **अर्थव्यवस्थेच्या** टिकाऊ विकासासाठी व्यावसायिक प्रशिक्षणाद्वारे मिळविलेल्या कौशल्यांचे महत्त्व अधोरेखित करतात.

दक्षिण कोरियाच्या शिक्षण मंत्रालयाने ऑक्टोबर २००७ मध्ये 'विकसनशील देशांसाठी व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण (व्हीईटी)' वरील एका चर्चासत्राच्या अध्यक्षपदासाठी मला आमंत्रित केले होते.

हा ग्लोबल एचआर फोरमचा एक भाग होता, ज्यामध्ये ५० देशामधील जवळजवळ १२०० शिक्षणतज्ञानी भाग घेतला होता. ह्या फोरममध्ये आमंत्रित करण्यात आलेले एकमेव दुसरे भारतीय आय.आय.टी.–मद्रासचे निर्देशक प्रा. अनंत हे होते.

दक्षिण कोरियाच्या उपपंतप्रधान मंत्र्यांनी ह्या ग्लोबल फोरमचे उद्घाटन केले. सुमारे ५० वर्षापूर्वी दक्षिण कोरियामधील जनता देखील भारतीयांच्या इतकीच गरीब होती.

दक्षिण कोरियाप्रमाणेच वायू, तेल आणि इतर हायड्रो–कार्बन्स यांच्या स्वरूपातील कच्चे धातू, कोळसा व उर्जा यासारखी अत्यंत कमी खनिज संपत्ती असणाऱ्या (म्हणजे भारतासारखे नाही), परंतु दुसऱ्या जागतिक युद्धामधील संपूर्ण विनाशानंतरही अत्यंत जलद गतीने विकास करणाऱ्या जपान व जर्मनी ह्या देशांचे दक्षिण कोरियाने निरीक्षण केले.

दक्षिण कोरियाने हे जाणून घेतले की त्यांच्या प्रगतीमागे मुख्य कारण हे **सुसंगत शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षणाद्वारे कौशल्याची निर्मिती** हे होते.

दक्षिण कोरियाने उपपंतप्रधान हे पद निर्माण केले, ज्याची **मुख्य जबाबदारी**, माझ्या मते मनुष्यबळ विकास, शिक्षण व कौशल्य निर्मिती ही आहे.

आज ५० वर्षानंतर दक्षिण कोरियन माणसाचे सरासरी उत्पन्न हे भारतीय माणसाच्या सरासरी यूएसडॉलर्स १,५३० च्या तुलनेत दरसाल यूएसडॉलर २३,८२३ एवढे आहे.

**ह्या वस्तुस्थिती मध्ये भारतीयांसाठी काही संदेश आहे काय?** आपण आता दुसरे उदाहरण पाहू या, जे सद्यस्थितीचे आहे.

सन २०२२ मध्ये एक राष्ट्र म्हणून आपण कोठे असू? किंवा आपल्या ७५व्या स्वातंत्र्यदिनी किंवा **भारत @ ७५ ?** कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री किंवा **सीआयआय** ह्यांनी जगविख्यात व्यवस्थापन गुरू **प्रो. सी. के. प्रल्हाद** यांच्या साथीने **भारत @ ७५** साठी योजना आखली आहे. सीआयआयच्या ७४ राष्ट्रीय समित्यांपैकी **शिक्षण, कौशल्ये आणि मनुष्यबळ** तसेच **युवापिढी** यावरील समित्या ह्या उपक्रमावर प्रामुख्याने कार्य करीत आहे.

याबाबतीत प्रो. प्रल्हाद यांचे मत अत्यंत सुस्पष्ट आहे. त्यांचे मत आहे की शिक्षण आणि कौशल्य निर्मिती व व्यावसायिक प्रशिक्षण यांच्याद्वारे जनतेचे, विशेषत: तरूण पिढीचे **सबलीकरण करूनच** सन २०२२ पर्यंत एक राष्ट्र म्हणून आपण आपली प्रमुख उद्दिष्ट्ये प्राप्त करू शकू.

ह्या योजनेनुसार सन २०२२ पर्यंत आपल्या देशाकडे विविध कौशल्यामधील ५०० दशलक्ष कुशल व्यक्ती आणि २०० दशलक्ष वेगवेगळ्या क्षेत्रामधील जागतिक पातळीवरील पदवीधर असायला हवेत.

भारतामधील शिक्षण, अर्थव्यवस्था, शासन आणि रोजगारनिर्मिती याबाबत अधिक माहिती www.wakeupcall.org वर किंवा आमच्या सुसंगत शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण यांच्या मार्फत भारतीय जनतेचे सबलीकरण करण्याच्या मार्गाने **'भारताचे परिवर्तन'** या नावाच्या पुस्तकात उपलब्ध आहे.

# ह्या पुस्तकाच्या प्रगतीचा इतिहास

१९९३ मध्ये आम्ही ४ पानांच्या पुस्तकाने सुरूवात केली.

१९९७ मध्ये ते ८ पानी झालं आणि त्याचे १० भारतीय भाषांमध्ये अनुवाद सुद्धा झाले.

१९९९ मध्ये पुस्तकाचा विस्तार १६ पानांपर्यंत झाला, २००१ मध्ये २४ पानांपर्यंत, २००२ मध्ये २८ पानांपर्यंत, २००४ मध्ये ३२ पाने, २००५ मध्ये ३६ पाने, २००६ मध्ये ४८ पाने आणि जानेवारी २००७ मध्ये ते ५६ पानांचे झाले.

जुलै २००८ मध्ये ह्या पुस्तकाचा ८८ पानांपर्यंत विस्तार झाला आणि जानेवारी २००९ मध्ये हे पुस्तक ९२ पर्यंत आणखी वाढविण्यात आले आणि ऑक्टोबर २००९ मध्ये ते ९६ पानापर्यंत वाढविण्यात आले.

फेब्रुवारी २०११ मध्ये ते १०० पानापर्यंत वाढविण्यात आले.

फेब्रुवारी २०१२ ची आवृत्ती १०२ पानांपर्यंत वाढविण्यात आली. वर्तमान एप्रिल २०१४ ची आवृत्ती १०४ पानांपर्यंत वाढविण्यात आली आहे.

हे **'भारताचे परिवर्तन'** पुस्तक इंग्रजीमध्ये आणि आसामी, बंगाली, गुजराती, हिंदी, कन्नड, मल्याळम्, मराठी, ओरिया, पंजाबी, तामिळ, तेलगू आणि उर्दू अशा १२ भारतीय भाषांमध्ये उपलब्ध आहे.

नेहमी या चार क्षेत्रांवरच समान प्रकाशझोत राहिलेला आहे.

१ **प्रशासन** ........ *भारत १ला*

२ **शिक्षण आणि मनुष्यबळाचा विकास** ........ *शिक्षण १ले*

३ **अर्थव्यवस्था आणि उद्योग** ........ *अर्थव्यवस्था १ली*

४ **रोजगार निर्मिती** ........ *रोजगार १ला*

*i Watch*च्या *भारत १ला, शिक्षण २रे, अर्थव्यवस्था ३री* आणि *रोजगार ४था* असे वर उल्लेख केल्यानुसार चार विभाग आहेत. पहिल्या तीन विषयांमध्ये प्रत्येकी दहा, बारा आणि नऊ लेख आहेत आणि ४थ्या मध्ये १६, एकूण ४७ नोंदी आणि निरीक्षणे.

वाचकाला सोपे जावे म्हणून प्रत्येक पानाच्या खाली वरील ४ प्रकारांपैकी त्या लेखाची वर्गवारी नमूद करण्यात आली आहे.

जेव्हा वरील ४ पैकी कोणत्याही गटात बसत नाही तेव्हा आम्ही त्याला **'सर्वसाधारण'** या गटात टाकले आहे.



# अमर प्रेरणा

## नोबल पुरस्कार प्राप्त कवि – रवीन्द्रनाथ टागोर

**भारत हे एक राष्ट्र बनू शकते ही गोष्ट रवीन्द्रनाथ टागोर यांच्या शब्दात अत्यंत उत्तम प्रकारे सांगण्यात आली आहे.**

*जेथे मन आहे भयमुक्त आणि माथे उन्नत;*

*जेथे शिक्षण असते मुक्त;*

*जेथे अरूंद संकुचित भिंतीनी जगाची शकले उडालेली नसतात;*

*जेथे शब्द येतात सखोल सत्याचा आधार घेऊन;*

*जेथे अथक परिश्रम पसरतात बाहू संपूर्ण पूर्णत्वासाठी;*

*जेथे विचारांचा निर्मळ झरा जुनाट सवयींच्या भयाण वाळवंटातील रेतीमध्ये*

*आपला मार्ग हरवलेला असतो;*

*जेथे मन सतत विस्तृत होणारे विचार आणि कृती यांच्या आधारे कार्य करते –*

*त्या स्वातंत्र्याच्या स्वर्गामध्ये, माझ्या पित्या, माझ्या देशाला जाग येऊ दे!*

*गितांजली, पद्य XXXV*

# नागरिकाचे प्रयत्न

एक नागरिक असणाऱ्या एका आयआयटी इंजिनिअरचे सुसंगत शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यांच्याद्वारे **भारताचे परिवर्तन** सुरू करण्यासाठी आणि त्याला गतिमान करण्यासाठी प्रयत्न.

आपल्यापैकी प्रत्येकाचे एक कर्तव्य असते, बऱ्याच जणांना त्याची जाणीव होते आणि बऱ्याच जणांना होत नाही.

आपण कशावर लक्ष केंद्रित करायला हवं हे नीटपणे समजणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

बाकीच्या गोष्टी पाठोपाठ येतातच........................................................................................................................

एक असा बिगर–राजकीय, धर्म–विरहीत, पंथहीन प्रयत्न ज्याचे एकमेव ध्येय आहे लोकांमध्ये जागृती घडवून आणणे आणि फक्त असे केल्यानेच भारतातील लोकांची सुप्त क्षमता ते ठरवू शकतील आणि समजू शकतील; आपलं काय चुकलं आणि ह्या पुस्तकाचे महत्त्व का निर्माण झालं.

आपण अगदी साचेबंदपणे विचार करावा असं भारताबाबत बरंच काही आहे.

**ही कृती म्हणजे केवळ एक बीज आहे. त्याची प्रगती होईल असंख्य हातांमधून ज्यातील एक हात तुमचाही असेल.**

# पुस्तकाचा हेतू

सर्वात मोठे आव्हान १००% कार्यक्षम साक्षरता, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण देणे आणि उच्च वैद्यकीय आणि तांत्रिक शिक्षणाच्या सर्व प्रकारांची अस्तित्वात असलेली संरचना अनेक पटीनी विस्तृत करून भारताला पूर्वी होते त्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय शैक्षणिक पीठ बनविणे हे आहे.

भारताला शक्य तितक्या लवकर आपल्या तरूणांना उपयुक्त शिक्षण आणि प्रशिक्षण देऊन सामर्थ्यशाली बनविणे गरजेचे आहे.

भारतीयांचे सरासरी वय आहे **२६** वर्षे.

आपली पहिल्या क्रमांकाची प्राधान्यता ही **बालिका आणि स्त्रिया यांना सुशिक्षित व समर्थ बनविणे.**

# आम्ही तुमच्यासाठी काय करू शकतो?

प्रिय वाचक, आम्ही तुम्हाला पुढील बाबींमध्ये सहाय्य आणि मदत करू शकतो.

## १. प्रकाशने

ह्या पुस्तकापासून सुरूवात करूया. कृपया पृष्ठ ९५ वर **प्रकाशनांच्या इतर सूचीचे** सविस्तर तपशील पहा. आम्ही तुम्हाला ह्या पुस्तकाच्या मुखपृष्ठाच्या आतील पृष्ठ पाहण्यासाठी व ह्या १०४ पृष्ठांच्या पुस्तकापासून हे पुस्तक आता हिंदी, उर्दू, पंजाबी, आसामी, बंगाली, ओरिया, गुजराती, मराठी, तामिळ, तेलगू, कन्नड आणि मल्याळम ह्या **१२ भारतीय भाषांमध्ये** देखील उपलब्ध असल्याची नोंद घेण्याची विनंती करीत आहोत. भारतातील फक्त ७% जनतेलाच इंग्रजी समजते.

## २. चर्चात्मक कार्यशाळा

पृष्ठ ९१ वर सविस्तर नमूद केल्यानुसार आम्ही पुढील विषयांवर चर्चात्मक कार्यशाळांचे आयोजन करतो. 'भारतासाठी **सुसंगत उत्पादन धोरण**', भारतासाठी **सुसंगत शैक्षणिक धोरण**', '**जागतिकीकरण** आणि भारत दरवर्षी +१०% दराने वाढ कशाप्रकारे करू शकेल?' '**चांगला राज्यकारभार** आणि त्याचा नागरिकाला कशा प्रकारे फायदा होतो?', 'दरवर्षी १० दशलक्ष व्यक्तिंसाठी **रोजगार निर्मिती**', 'कॉलेजमधून बाहेर पडल्यावर **पैसे कसे मिळवावेत**?' 'शिक्षणाद्वारे **भारताचे परिवर्तन**'.

## ३. शिक्षक, पालक आणि तरुण यांच्या मनोवृत्तीमध्ये बदल घडविणे.

पृष्ठ ९७ वर सविस्तर सांगितलेल्या योजना १ व २ पहा. तेथे ह्या योजनांचे केवळ वर्णनच केलेले नाही तर या योजनांच्या सकारात्मक परिणामांचे सविस्तर वर्णन देखील करण्यात आले आहे.

## ४. सुसंगत आकडेवारी पुरविणे

कृपया आमची वेबसाइट www.wakeupcall.org तसेच पृष्ठ ९२ वर सविस्तर वर्णन केलेल्या संदर्भसूची मधील कलम १ मध्ये नमूद केलेली आमची प्रकाशने पहा, म्हणजे तुमच्या लक्षात येईल की, तुम्हा वाचकांसाठी आम्ही भरपूर सुसंगत आकडेवारी गोळा केलेली आहे आणि वाचन करणे व समजून घेणे सुलभ व्हावे अशा प्रकारे तिची मांडणी केलेली आहे. आमची सर्व आकडेवारी वर्षातून एकदा शक्य तेवढी अद्ययावत केली जाते.

## ५. भारतामध्ये व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण केंद्राची उभारणी

आम्ही भारतामध्ये दरवर्षी भरपूर व्यक्तिंना सामूहिकरित्या प्रशिक्षण देणाऱ्या काही मोठ्या संस्थेबरोबर काम करतो. आम्ही त्यांच्या **माहितीमधील भागीदार** आहोत. तंत्रज्ञान, प्रत्यक्ष प्रशिक्षण केंद्रे यांचा वापर करून अशा प्रकारच्या प्रशिक्षण केंद्रामधील एकात्मतेचा प्रत्येक स्थानिक विभागामधील व्यापार व उद्योग यांच्यामधील प्रत्यक्ष प्रशिक्षणासाठी प्रशिक्षित प्रशिक्षक व पर्यवेक्षक पुरविण्यासाठी, मुल्यांकने, परीक्षा व प्रशिक्षित व्यक्तिंना प्रमाणित करण्यासाठी तसेच प्रशिक्षणापूर्वी समुपदेशन व प्रशिक्षणानंतर रोजगार नेमणूका देऊन आम्ही भारतातील कोणत्याही भूभागातील अथवा जिल्ह्यातील तरूणांसाठी भरघोस मौल्यवान मदत पुरवितो. सध्या आम्ही शेती, उत्पादन सेवा या क्षेत्रातील व्हीईटी अभ्यासक्रमांवर लक्ष केंद्रित करीत आहोत आणि भारताच्या सर्व भागांमध्ये केंद्रांची उभारणी करण्यासाठी साह्य करीत आहोत. विनंती केल्यास या विषयीचा तपशील मिळू शकेल.

# *i Watch* च्या प्रकाशझोतातील क्षेत्रे

## शिक्षण

**आम्ही या समस्येबाबत काम करीत आहोत कारण...**

१. बालवर्गापासून १०+२ वर्गांपर्यंत शिक्षण बंद पडण्याचा दर ८७% ते ९३% असून यात ज्यांनी शाळेचे कधीही तोंड पाहिले नाही त्यांचा देखील समावेश आहे.

२. वृद्धी, संशोधन आणि विकास, गुणवत्ता आणि क्षमता यावर मर्यादा आणणारे उच्च, वैद्यकीय आणि तांत्रिक शिक्षणामधील 'लायसन्स राज' आणि नियमावल्या.

३. रिक्त जागा आणि दर्जेदार शिक्षण यांच्या भारतामधील अभावामुळे विदेशी विश्व-विद्यालयांमध्ये शिक्षणासाठी जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांमुळे दरवर्षी भारताबाहेर जाणारा यूएस $ १० ते $ १२ बिलीयन किंवा रू. ५०,००० कोटी एवढा अर्थप्रवाह. हा निधी दरवर्षी ५० आयआयएम आणि ३० आयआयटी बांधण्यासाठी पुरू शकणार आहे. दरवर्षी विदेशी शिक्षणासाठी सुमारे १,५३,००० विद्यार्थी बाहेर जातात असा अंदाज आहे. त्यापैकी ५०%, २ वर्षाच्या मास्टर अभ्यासक्रमाची निवड करतात आणि उरलेले ५०%, ४ वर्षाचा अंडर ग्रॅज्युएट अभ्यासक्रम निवडतात.

४. सुमारे ६७% ह्या शासकीय आकडेवारीच्या तुलनेत प्रत्यक्ष कार्यक्रम साक्षरता ३३% अपेक्षित आहे. परंतु चीनमध्ये हीच आकडेवारी ९३%च्या जवळपास आहे.

५. पुरेसा कौशल्यविकास. चीन आणि इतर विकसित देशांमध्ये गरज असणाऱ्या ७% ते १०% यांच्या तुलनेत संघटीत क्षेत्रामध्ये केव्हाही जेमतेम ०.५% कामगार शक्तीला प्रशिक्षण दिले जाते.

६. भारतामध्ये २७,००० परदेशी विद्यार्थी आहेत तर ऑस्ट्रेलियामध्ये ४००,००० परदेशी विद्यार्थी आहेत.

७. भारतामध्ये १.७ दशलक्ष शाळा आहेत तर चीनमध्ये २.५ दशलक्ष.

८. भारतामध्ये ५६३ विश्व-विद्यालये आहेत तर चीनमध्ये ११००.

९. मानवी मेंदूच्या ९०% भागाची वाढ वय वर्षे १ ते ६ दरम्यान होत असून देखील पूर्व प्राथमिक शिक्षणाला महत्त्व दिले जात नाही.

## प्रशासन

**आम्ही या समस्येबाबत काम करीत आहोत कारण...**

१. भारतातील ३५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश देश चालविण्यासाठी दररोज सुमारे ३,६०० कोटी रुपये किंवा यूएस $ ०.७२ बिलीयन खर्च करतात. एवढे करून नागरिक आनंदी आहेत?

२. चीन+हाँगकाँग मधील एफडीआय साठा यूएस $ १९२० बिलीयनच्या तुलनेत भारतामधील एफडीआय जेमतेम यूएस $ १२१ बिलीयन का आहे?

३. दरवर्षी ८० दशलक्ष या चीनमधील प्रवासी वाहतुकीच्या तुलनेत भारतातील प्रवासी वाहतूक दरवर्षी ६ दशलक्ष एवढीच का आहे?

४. जागतिक व्यापार चीनच्या ८.०%च्या तुलनेत २.२% एवढाच आहे.

५. भारतातील दर एकरी कृषि उत्पादकता चीनच्या तुलनेत ४०% एवढीच आहे.

६. भारतातील जीवनमान ६७ वर्षे तर चीनमध्ये ते ७४ वर्षे आहे.

७. विद्युत मंडळांकडून वहन आणि इतर प्रकारे होणारी विजेची हानी भारतामध्ये २५% ते ५०% आहे तर चीनमध्ये ६% ते ८% आहे.

८. चीनमधील यूएस $ २१९९ बिलियन्स या विदेशी मुद्रा साठ्याच्या तुलनेत भारतात तो यूएस $ २८० बिलियन्स एवढा आहे.

९. भारतामध्ये एचआयव्ही/एड्सने सुमारे ५ दशलक्ष लोक ग्रस्त आहेत, तर चीनमध्ये ०.८५ दशलक्ष.

१०. हलक्या दर्जाच्या शेतकी व्यवस्थापनामुळे ४०% फळे व भाज्या खराब होतात किंवा फेकल्या जातात.

११. भारतात भरपूर पाऊस पडतो, परंतु वाईट जलव्यवस्थापनामुळे आपल्याकडे पूर तरी येतात किंवा दुष्काळ तरी पडतो.

## अर्थव्यवस्था

**आम्ही या समस्येबाबत काम करीत आहोत कारण...**

१. कामगार कायद्यांमुळे भारतीय संस्थांना विद्यमान अर्थव्यवस्थेमध्ये पुरेशी मोकळीक मिळत नाही.

२. आपण कामगारांवर भर देणाऱ्या उद्योगांपेक्षा भांडवलावर भर देणाऱ्या उद्योगांकडे लक्ष देत असल्यामुळे रोजगार निर्मितीस प्रतिबंध होतो.

३. भारताचा जीडीपी जगाच्या फक्त २.६% आहे. क्रयशक्ति कमी आहे परंतु जास्त लोकसंख्येमुळे मागणी १७% जास्त

<१ बिलियन (दशकोटी) = १००० दशलक्ष> <१ दशलक्ष = १० लक्ष> <१ कोटी = १०० लक्ष = १० मिलियन्स> <१ युएस$ = रु. ६० (अंदाजे)>

आहे. यावर निर्यात हाच उपाय आहे. या गोष्टीकडे गेल्या ६६ वर्षात पुरेसे लक्ष देण्यात आलेले नाही. एसईझेड जास्त गतीने विकसित होण्याची गरज आहे.

**४.** येथील पायाभूत गोष्टी (संरचना) १,२१० दशलक्ष जनतेच्या दृष्टीने अत्यंत अपुऱ्या आहेत. याविषयी बरेच बोलले जाते पण अंमलबजावणी मात्र अत्यंत कमी असते.

**५.** भारताने जागतिक बाजारपेठेत क्रय शक्तिमधील फरकाच्या सामर्थ्याचा वापर करून घेणे गरजेचे आहे. पीपीपी हे जागतिक व्यापारासाठी आहे.

**६.** आयटी आणि सॉफ्टवेअर भारतीय अर्थव्यवस्थेच्या ५% तर जागतिक अर्थव्यवस्थेच्या फक्त ३% आहे. भारताने जागतिक अर्थव्यवस्थेतील शेष ९७% कडे लक्ष द्यायला हवे आणि ती जागतिक दर्जाची बनविली पाहिजे.

**७.** एसएमईची उपयुक्तता अद्याप पूर्ण लक्षात घेण्यात आलेली नाही. वर्तमान व्याख्या ईयू, यूएसए, जपान, चीन इ. नुसार जागतिक प्रमाणांप्रमाणे नाही. जगातील सर्व संस्थांपैकी ९९.७% एसएमई असल्यामुळे हा भारतीय व्यवसायाचा मोठा तोटा आहे. भारताच्या जीडीपीच्या फक्त ५% एसएसआय आहेत. तर एसएमई हे ७०% ते ८०%च्या जवळपास असू शकते. उद्योग मंत्रालयाचे लक्ष उद्योगांकडून अर्थव्यवस्थेकडे गेले पाहिजे.

# रोजगार निर्मिती

**आम्ही ह्या समस्येबाबत काम करत आहोत कारण...**

**१.** भारतामध्ये ४३ दशलक्ष नोंदणीकृत बेरोजगार आहेत आणि १८ ते ५० वर्षे या वयोगटातील आणखी २६० दशलक्ष लोक अर्ध रोजगारीवर किंवा निम्न बेरोजगार आहेत.

**२.** भारतामधील सर्वसाधारण जीवनमान हे २६ वर्षे आहे तर तुलना केल्यास चीनमधील माणसाचे जीवनमान ३४ वर्षे असून युरोपिअन, अमेरिकन किंवा जपानी यांचे ४० ते ४५ वर्षे असावे. भारत हा तसा अत्यंत तरूण व्यक्तिंचा देश आहे. एवढ्या साऱ्या 'तरूण भारतीयांचा' सदुपयोग करून घ्यायचा असेल तर आपण आपल्या लोकांना कुशल बनविले पाहिजे.

३. चीन ३००० व्यवसाय हाताळणाऱ्या आपल्या ५ लक्ष व्हीईटी केंद्रांमधून व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण (व्हीईटी) देण्यासाठी आपल्या जीडीपी पैकी जवळपास २.५% एवढा खर्च करते. भारत मात्र सुमारे ४०० व्यवसाय हाताळणाऱ्या आपल्या ८५०० व्हीईटी केंद्रावर जीडीपीमधील जेमतेम ०.१% एवढाच खर्च करते. प्रत्यक्षात व्हीईटीवर होणारा खर्च जास्त आहे परंतु आकडेवारी उपलब्ध नाही.

४. सर्वसाधारण शिक्षण आणि ज्ञानामधील वाढ करू शकत नाही, परंतु व्यावसायिक शिक्षण हे रोजगार आणि संपत्तीची निर्मिती यांच्याशी प्रत्यक्ष जोडलेले आहे. व्हीईटीचे सर्वसामान्य माणसाला होणारे फायदे हे कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळ वापरणाऱ्या संस्थाना फायदेशीर ठरतात आणि हे फायदे राष्ट्राला जागतिक पातळीवर स्पर्धात्मक होण्यासाठी तेव्हाच उपयुक्त ठरतील जेव्हा वय वर्षे १५ वरील जवळजवळ ८०% तरूण बीए, बीएससी किंवा बीकॉम यासारख्या सर्वसामान्य महाविद्यालयीन शिक्षणाकडे न वळता व्हीईटीच्या पर्यायाची निवड करतील.

५. लोकसंख्येमुळे संपूर्ण जगातील बाजारपेठेत कुशल तरूण पुरविण्याच्या संधीचा व्हीईटीचा वापर करून भविष्यकालीन भारतीयांनी लाभ घेतला पाहिजे.

६. सध्याच्या ४९० दशलक्ष कामगार शक्तीला संघटीत क्षेत्रातील ३० दशलक्ष आणि असंघटीत क्षेत्रातील ४६० दशलक्ष असे विभागता येईल. ह्या असंघटीत क्षेत्रातील ४६० दशलक्ष व्यक्तिंना जागतिक दर्जाचे व्हीईटी पुरविणे हे आपल्यापुढील सर्वात मोठे आव्हान आहे.

७. बऱ्याचशा एसएमईज् असंघटीत क्षेत्रात आहेत. एसएमई ह्या अर्थव्यवस्थेच्या खऱ्या 'उर्जास्त्रोत' आहेत. एसएमईज्ना व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण यांच्या साह्याने भरारी मारण्याचे सामर्थ्य दिले तर जगामध्ये तरूण, कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळाचा एक जबरदस्त साठा तयार होईल. असे केल्याने भारताला आर्थिक शक्ती म्हणून आणखी पुढे सरकता येईल.

८. स्विट्झरलँड किंवा ऑस्ट्रिया सारख्या देशांमध्ये फक्त प्रत्येक दर ८ दशलक्ष लोकांसाठी ५००० व्हीईटी केंद्रे आहेत. ह्या देशांना भूमीची मर्यादा आहे आणि त्यांच्याकडे खनिज संपत्ती किंवा उर्जा नाही. परंतु उच्च दर्जाचे मनुष्यबळ असल्यामुळे त्यांना जीडीपी हा भारताच्या जवळपास ३३% आणि २३% आहे.

९. सध्याचा ''उमेदवारी कायदा'' हा देशाच्या वर्तमान गरजांच्या अनुसार नाही. त्याचे अशाप्रकारे संपूर्णत: परिवर्तन करण्यात आले पाहिजे की, जवळपास १०% कामगार शक्तिमधील व्यक्ति ह्या प्रशिक्षित उमेदवार असतील आणि त्याच ठिकाणी काम करू शकतील.

<१ बिलियन (दशकोटी) = १००० दशलक्ष> <१ दशलक्ष = १० लक्ष> <१ कोटी = १०० लक्ष = १० मिलियन्स> <१ युएस$ = रु. ६० (अंदाजे)>

# *i Watch* बाबत नागरिकांच्या प्रतिक्रिया

भारतीय संघटना आणि व्यक्ती यांच्याकडून गेल्या दहा वर्षांमध्ये मिळालेली पत्रे आणि संपर्क यांच्या आधारे **प्रतिक्रिया आणि प्रतिसाद** यांची नोंद घेण्यात आली आहे.

यापैकी काही निवडक पत्रव्यवहार एका संग्रहामध्ये एकत्रित करून ठेवलेला असून तो आमच्या मुंबई येथील कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध आहे. त्यापैकी काही प्रतिक्रिया खालील पानांमध्ये व्यक्त झालेल्या आहेत.

थोडक्यात सांगायचे तर, *i Watch* ने अंगीकृत केलेल्या वरील धोरणांच्या आधारे भारताच्या विविध भागांमध्ये सुरू केलेल्या मनोवृत्तीमधील बदल आणि कृती योजना याबाबत आम्ही अत्यंत समाधानी आहोत.

- माझी धोरणे आणि औद्योगिक प्रशासन यांच्या रचनेमध्ये तुमच्या कागदपत्रांमध्ये व्यक्त झालेल्या काही ज्ञानाचा वापर करता येईल अशी मी आशा करतो.
***एन.आर. नारायण मूर्ती, चेअरमन ॲण्ड चीफ मेन्टर, इन्फोसिस***

- नागरिकांना लाभ होण्याच्या दृष्टीने *i Watch* करीत असलेल्या ह्या सत्कार्याची चेम्बर प्रशंसा करीत आहे.
***पी.एन. मोगरे, सेक्रेटरी जनरल, इंडियन मर्चंट्स चेम्बर***

- *i Watch* चे कार्य हे कृष्ण खन्ना आयुष्यामध्ये आणि कामामध्ये जेथे जेथे गुंतले होते. तेथे तेथे सुधारणा आणि परिवर्तन करीत आले आहेत तेच कार्य आहे.
***डॉ. पी.एस. राणा, चेअरमन ॲण्ड मॅनेजिंग डायरेक्टर, हुडको***

- आम्ही ५०० हून जास्त एनजीओजच्या संपर्कात असतो आणि आम्हाला हे सांगायलाच हवं की *i Watch* हे एक अनोखी आणि नावीन्यूपर्ण एनजीओ असल्याचे आम्हाला आढळले आहे.
***विनय सोमाणी, मॅनेजिंग ट्रस्टी कर्मयोग डॉट कॉम***

- भारतातील जनतेला जास्तीत जास्त लाभ व्हावा अशी धोरणे घडविण्याबाबत असलेल्या *i Watch* च्या कल्पना आणि सूचना यांच्यावर आमचा विश्वास आहे.
***अनुपम मित्तल, प्रेसिडेंट ॲण्ड सीईओ, पीपल ग्रुप***

- *i Watch* सारखी भारतामध्ये परिवर्तन घडविणारी एवढी प्रामाणिक योजना इतर कोणत्याही एनजीओकडे असल्याचे मी ऐकलेले नाही.
***मेजर जनरल डी. एन. खुराणा, डायरेक्टर जनरल, ऑल इंडिया मॅनेजमेंट असोसिएशन***

- जागृती निर्माण करणे, सूचना आणि कृती योजना पुरविणे आणि शैक्षणिक सुधारणा व भारताचे परिवर्तन यांच्या योजनांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये विविध प्रकारे काम करणाऱ्या व्यक्तिंना मदत करणे व त्यांची शृंखला (नेटवर्किंग) तयार करणे याबाबत *i Watch's* घेत असलेल्या परिश्रमाची मी खरोखरच प्रशंसा करते.
***सुषमा बर्लिआ, प्रेसिडेंट, एज्युकेशन प्रमोशन सोसायटी फॉर इंडिया***

- भारताची उच्च दर्जाची व कायमस्वरूपी वाढ होण्यासाठी आवश्यक असणारी चौकट निर्माण करण्यासाठी ते सिद्ध झाले आहेत. या हेतूने ते एकमत तयार व्हावे आणि धोरणात्मक बदल घडवून आणावेत यासाठी कार्य करीत आहेत. दीर्घकालिन परिणाम घडवून आणण्यासाठी आखण्यात आलेले हे एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण धोरण आहे.
***राजीव कुमार, चीफ इकॉनॉमिस्ट, सीआयआय***

- भारतातील लोकांच्या हितासाठी विशिष्ट सुसंगत धोरणामधील आवश्यक  ते बदल मांडणे आणि उत्तम प्रशासनाचे महत्त्व आणि गरज समजावून सांगणे याबाबत *i Watch* एक उत्तम कार्य करीत आहे.
***डॉ. बी.पी. ढाका, सेक्रेटरी जनरल, पीएचडीसीसी ॲण्ड आय***

- एका शिक्षणतज्ञ आणि मनुष्यबळ विकास सल्लागार या नात्याने मला भरपूर विश्वास वाटतो की ९५% तरूणांना व्यावसायिक शिक्षणाच्या ३००० क्षेत्रांमध्ये प्रशिक्षित करण्याची *i Watch* ची योजना ही अत्यंत नावीन्यपूर्ण आहे. जर ती अमलात आणली गेली तर भारतातील बेरोजगारीच्या समस्यांवर ती एक फार मोठा उपाय ठरू शकेल.
***प्रो. ऋषीकुमार पंड्या, इंटरनॅशनल मॅनेजमेंट गुरु.***

- मी *भारताचे परिवर्तन* असे नाव असणारे तुमचे पुस्तक स्वारस्य घेऊन वाचले आणि ह्या पुस्तकातील अत्यंत उपयुक्त अभ्यास आणि सूचना याबद्दल तुम्हाला सदिच्छा देण्यास मला अत्यंत आनंद वाटतो. त्यामध्ये निर्माण केलेले प्रश्न अणि सुचविलेल्या शिफारशी अत्यंत मोलाच्या आहेत याविषयी मला अजिबात शंका नाही.
***बी.एन. युगंधर, सदस्य नियोजन समिती***

- तुमच्या *'भारताचे परिवर्तन'* या पुस्तकामध्ये उत्तम प्रशासनाबाबत तुम्ही केलेल्या काही सूचनांच्या पाठपुराव्याबाबत तुमच्याशी विस्तृत चर्चा घडण्याची मी वाट पहात आहे.
***एम. दामोदरन, चेअरमन ॲण्ड मॅनेजिंग डायरेक्टर, आयडीबीआय***

- *i Watch* करीत असलेल्या ह्या उत्तम कामगिरीची मला जाणीव आहे. उत्तम प्रशासन, प्रशिक्षण आणि रोजगार

याबाबतच्या तुमच्या दृष्टीकोनांची मी दखल घेतली आहे.
***एम. व्यंकट्या नायडू, अध्यक्ष भाजप***

- कृपया हे सत्कार्य असेच चालू ठेवा.
***डॉ. नटराजन, ऑल इंडिया कॉन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन***

- तुमचा संपूर्ण कार्यक्रम आणि भारताच्या उन्नत्तीसाठी तुम्ही घेत असलेले परिश्रम यामुळे मी अत्यंत प्रभावित झालो आहे.
***बाबू खलफान, यूएसए स्थित एनआरआय***

- *i Watch* जी स्वप्ने डोळ्यासमोर ठेवून उभारण्यात आले आहे तो उत्तम प्रशासनासाठी होत असणारा अत्यंत योग्य काळातील प्रयत्न आहे. तुमच्या संस्थेबरोबर सहकार्य करण्यास आम्हाला अत्यंत आनंद होईल.
***दिपंकार सन्वाळके, कार्यकारी संचालक, केपीएमजी***

- सर्वप्रथम ह्या तुमच्या संपूर्ण सादरीकरणाविषयी मी तुमचे अभिनंदन करते आणि व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण यामध्ये आपण एकत्रित काम करण्याविषयी स्वारस्य दाखविल्याबद्दल मला आनंदित आणि सन्मानित झाल्यासारखे वाटते आहे. पुढील संभाव्यतांचा मला अंदाज आहे.
***प्रा. रूपा शाह, व्हाईस चॅन्सलर,***
***एसएनडीटी महिला विद्यापिठ***

- आम्ही **आयसी सेंटर फॉर गव्हर्नसचे** संस्थापक सदस्य म्हणून आपले स्वागत करतो. तुम्ही अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांची केलेली निवड आणि मांडलेल्या कृती योजना यामुळे आमच्या सेंटरच्या कार्यकारी समितीचे सदस्य प्रभावित झालेले आहेत.
***प्रभातकुमार, भूतपूर्व मंत्रालय सचिव आणि***
***अध्यक्ष आयसी सेंटर फॉर गव्हर्नस***

- आमच्या मुख्य सचिवांबरोबर झालेल्या तुमच्या चर्चेच्या संदर्भात तुम्ही दिल्ली सचिवालयात एनसीटी सरकारच्या वरिष्ठ आणि मध्यम श्रेणीतील सुमारे ४५० अधिकाऱ्यांसाठी उत्तम प्रशासन व परिणामकारक व्यवस्थापन या विषयांवर चर्चात्मक सत्रांचे आयोजन केल्यास आम्हाला आनंद वाटेल.
***प्रकाशकुमार, एआर ॲण्ड आयटी सेक्रेटरी,***
***गव्हर्नमेंट ऑफ एनसीटी***

- **वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम** आणि **सीआयआय** यांनी 'भारत आणि विश्व २०२५' या विषयावर आयोजित केलेल्या चर्चात्मक कार्यशाळेमध्ये अभिप्राय व सूचना देणाऱ्या तज्ज्ञांच्या समितीचा भाग म्हणून *i Watch* ला आमंत्रित करण्यात येत आहे.
***कॉन्फिडरेशन ऑफ इंडिया इंडस्ट्रि***

- तुम्ही केलेल्या ह्या उत्तम कार्याबद्दल कृपया माझ्या अभिनंदनाचा स्वीकार करा. ही संधी साधून मी तुमच्या कार्यासाठी सर्वोत्तम सदिच्छा व्यक्त करतो आणि मला खात्री वाटते की तुमची प्रकाशने जागरूकता निर्माण करतील तसेच समस्या अधोरेखित करणे त्याचप्रमाणे आपण सर्वात जास्त लक्ष दिले पाहिजे अशा जागा दाखवून देणे, याबाबत एक अत्यंत महत्त्वाची शैक्षणिक भूमिका पार पाडतील.
***एम व्ही राजशेखरन्, नियोजन राज्यमंत्री, नियोजन आयोग***

- आपण एनआरआय–सिव्हील सोसायटी पार्टनरशिपवरील कॉन्फरन्स मध्ये सहभागी होण्यासाठी वेळ काढलात आणि आम्हाला मार्गदर्शन केले तर आम्हाला अत्यंत आनंद होईल.
***डॉ. अबिद हुसेन, अध्यक्ष,***
***ग्रुप फॉर इकॉनॉमिक ॲण्ड सोशल स्टडीज्***

- आपण दिलेल्या पाठिंब्याबद्दल मी आपली आभारी आहे. आम्हाला एक मजबूत आणि सक्रीय संघटनेत परिवर्तित होण्यासाठी त्याची मदत झाली आहे.
***पद्मिनी सोमाणी; संचालक, सलाम बॉम्बे फाऊंडेशन***

- तुमचे प्रकाशन हे अत्यंत रूचिपूर्ण साहित्य असते. तुमच्या दृष्टिकोनातील सुलभता आणि व्यवहार्यता यांची मी अत्यंत प्रशंसा करतो.
***के. एल. चुग, चेअरमन, एमेरीट्स, आयटीसी लिमिटेड***

- *i Watch* एक अत्यंत सुंदर काम करीत आहे आणि तुम्ही करीत असलेल्या संशोधनाच्या कार्यातून आमच्या चळवळीसाठी भरपूर माहिती मिळेल.
***सुदेश के. अगरवाल, सेक्रेटरी जनरल,***
***ऑल इंडियन्स फाऊंडेशन***

- मला हे मान्य करायलाच हवं की हे अत्यंत कष्टदायक काम आहे आणि तुम्ही भरपूर मौल्यवान आकडेवारी व माहिती गोळा केली आहे. मी तुम्हाला वचन देतो की माझ्या मर्यादित शक्तीनुसार मी तुमची माहिती शक्य त्या सर्व व्यासपीठांवरून मांडण्याचा प्रयत्न करीन.
***पी. एन. रॉय, चेअरमन, इंडो–असाही ग्लास लिमिटेड***

- आपल्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विश्वावर अशुभपणे घिरट्या घालणाऱ्या संकटांची यादी करण्याचे तुमचे प्रयत्न हे खास नोंद घेण्यासारखे आहेत.
***आर. एस. अगरवाल, जॉईंट चेअरमन,***
***एनामी ग्रुप ऑफ कंपनीज***

- मी तुमचा **'भारताचे प्रशासन आणि व्यवस्थापन'** यावरील लेख बारकाईने वाचला आणि मी खूपच भारावलो आणि उत्तेजित

सुद्धा झालो. प्रत्येकाला जागे करून विचार करायला लावण्याइतका तो प्रभावी आहे. तो बरोबर नस पकडतो. भारताचे दुखणे काय आहे हे तुम्ही व्यवस्थित लक्षात आणून दिलेले आहे.
***प्रकाश अल्मेडा, डायरेक्टर, इन्स्टिट्यूट फॉर स्टडी ऑफ इकॉनॉमिक इश्यूज***

- मला खात्री आहे की ही नोंद वाचणाऱ्या प्रत्येकाला ती विचार करायला लावेल आणि ह्या विचारांमधून काही थोड्या व्यक्ति तरी तुम्ही चितारलेले स्वप्न वास्तवात आणण्यासाठी थोडीतरी कृती करतील.

***एन. विठ्ठल, सेंट्रल व्हिजिलन्स कमिशन, सीव्हीसी***

- तुमची विषयाची उकल सुंदर आहे, कल्पना नवनिर्मित आहेत आणि तुम्ही दिलेली काही आकडेवारी तर मनाला घाबरवणारी आहे. संपूर्ण भारतातील प्रसिद्धी माध्यमामार्फत तुमच्या कल्पना मोठ्या प्रमाणावर प्रसृत व्हाव्यात, असे मला वाटते.

***एच. एन. दस्तुर, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर,***
***भारतीय विद्याभवन***

- जागृती झाली की कृती सुद्धा घडून येईल आणि ह्या धर्मयुद्धात मी व माझ्यासारखे बरेच भारतीय तुमच्या सोबत आहेत. आगे बढो.

***सुशील गुप्ता, भूतपूर्व डिस्ट्रीक्ट गव्हर्नर,***
***रोटरी डिस्ट्रीक्ट ३०१०***

- मी तुम्हाला खात्री देतो की तुमच्या पत्रात तुम्ही उल्लेख केलेला **'एक कलमी कार्यक्रम'** चालविण्यासाठी माझ्या शक्तिनुसार शक्य असेल ते करण्याचा मी प्रयत्न करीत राहीन.

***जॉर्ज फर्नांडिस, संरक्षण मंत्री, भारत सरकार***

- तुमच्या मौल्यवान अनुभवाचा लाभ आम्हाला दिल्याबद्दल आम्हाला धन्यता वाटते.

***एअर कमोडोर अमरीत लाल, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर,***
***इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट***

- तुमच्या नोटमध्ये तुम्ही मांडलेल्या दृष्टिकोनाची मी प्रशंसा करतो आणि समाज योग्य दिशेने विकसित करण्यासाठी मदत करू शकेल अशा नवीन कल्पना आणि व्यावहारिक प्रयोगांची अपेक्षा करतो.

***सुरेश प्रभू, संसद सदस्य, लोकसभा***

# *i Watch* विषयी

## *i Watch* हे काय आहे ?

*i Watch* हे भारताच्या परिवर्तनासाठी नागरिकांचे आंदोलन आहे. '*i*' म्हणजे भारत, भारतीय, तुम्ही आणि आम्ही. *Watch*' म्हणजे आपण 'लक्ष' ठेवून आहोत, या देशात काय घडत आहे यावर. सुधारण्याच्या हेतूने जागृती निर्माण व्हावी म्हणून ही बाब नागरिकांच्या कानावर घालीत आहोत.

यातील '*i*' हे अक्षर दुसऱ्या लिपीत किंवा लहान लिहिले आहे कारण आपल्या गुरुजनांनी आपल्याला नेहमीच शिकवलेले आहे की फक्त, नम्रतेच्या जोरावरच आपण सत्याची जाणीव करून घेऊ शकतो. आपण **मनुष्यबळ संवर्धन, प्रशासन, अर्थव्यवस्था, उद्योग** आणि **रोजगार निर्मिती** यांच्यावर आणि त्यांच्या अंतर्गत संबंधाच्या समुचिततेवर लक्ष केंद्रित करणार आहोत.

*i Watch* ही मुंबई, भारत येथे मुख्य कार्यालय असणारी नोंदणीकृत धर्मादाय संस्था आहे.

*i Watch* साठी दिलेल्या देणग्या ह्या भारतीय संस्था आणि नागरिक ह्यांना ८०जी खाली आयकर लाभ देण्यास पात्र आहेत.

परदेशी देणग्यांसाठी एफसीआरएची मान्यता जानेवरी २००९ मध्ये मिळाली आहे.

## आम्ही भारतात परिवर्तन घडविण्यासाठी कशा प्रकारची योजना आखली आहे ?

*i Watch* तीन टप्प्यांवर कार्य करते.

१. **जागृती निर्माण करणे**
*'भारत एक ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था बनवूया', 'भारत जो तुम्हाला माहितच नसेल'* आणि *'भारतासाठी कृतीयोजना'* यासारखी प्रकाशने जागृती निर्मितीच्या कामासाठी वापरणे.

२. **उपाय आणि कृती योजना**
ही गोष्ट आमची वेबसाईट, चर्चात्मक कार्यशाळा आणि *भारताचे परिवर्तन* हे आमचे १०४ पानी पुस्तक ह्याद्वारे ही गोष्ट साधण्यात येते.

३. **प्रत्यक्ष अंमलबजावणी**
ह्यासाठी आम्ही शासन, जनता, खासगी सार्वजनिक संस्था आणि एनजीओज यांना मदत करतो आणि त्यांच्याबरोबर नेटवर्किंग करतो.

## *i Watch* ने काय साध्य केले आहे?

१९९२ मध्ये जेव्हा आम्ही 'भारताचे परिवर्तन'ची वाटचाल सुरू केली तेव्हा आम्ही कोणत्या दिशेने जाऊ याची आम्हाला कल्पना नव्हती.

भारताच्या परिवर्तनासाठी लक्ष देण्यासारखी क्षेत्रे काय आहेत याबाबत काही मूलभूत निर्णयावर येण्यासाठी आम्हाला ४ वर्षांचे संशोधन आणि प्रवास करावा लागला.

ही गोष्ट आम्हाला १९९६ मध्ये साधता आली. खरे काम १९९७ मध्ये सुरू झाले आणि अखेरीस सगळे लक्ष पुढील ४ महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये केंद्रित झाले:–

१. **मनुष्यबळ संवर्धन, व्यावसायिक शिक्षण आणि रोजगार निर्मिती**
२. भारताचे **शासन आणि प्रशासन**
३. एसएसआय, एमएसएमईज् आणि संबंधित कामगार कायदे याविषयीच्या **धोरणांमधील बदल**
४. **अर्थव्यवस्था, उद्योग** म्हणजेच निर्यात आणि किरकोळ व्यापार, घाऊक व्यापार, निर्मिती, प्रवास आणि पर्यटन आरोग्य निगा, संरचना आणि शेती यासारख्या अर्थव्यवस्थेतील इतर क्षेत्रांवर भर देणे.

*i Watch* ला वरील चारही क्षेत्रांमध्ये थोडेफार यश मिळाले आहे कारण आम्ही निर्णय घेणाऱ्या व्यक्तिंच्या एका मोठ्या समूहाच्या मानसिकतेमध्ये बदल घडवू शकलो आहोत आणि त्यासाठी आम्ही पुढील गोष्टींचा वापर केला.

१. चर्चात्मक कार्यशाळा, परिषदा आणि लेख
२. प्रकाशने *'भारताला एक ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था बनविणे'*, *'तुम्हाला कदाचित माहित नसलेला भारत'* आणि *'भारतासाठी कृतीयोजना'*
३. भारताचे परिवर्तन, १०४ पानी पुस्तक
४. वेबसाईटwww.wakeupcall.org
५. एमएचआरडी, नियोजन आयोग, चेम्बर्स ऑफ कॉमर्स, सीआयआय, एफआयसीसीआय, आयटी मंत्रालय इत्यादींच्या राष्ट्रीय समितिमध्ये सहभाग

सीआयआय, एफआयसीसीआय, एएसएसओसीएचएएम, पीएचडीसीसी ॲण्ड आय, आयएमसी, एमईडीसी, बीसीसी ॲण्ड आय यांचे सदस्य या नात्याने आणि आयबीए, आरबीआय व एमओएफ यांच्या बरोबर झालेल्या चर्चांमधून

## परिवर्तन ही जीवनातील एकमेव शाश्वत गोष्ट आहे

आम्ही **एसएमईचे** महत्त्व पटवून देऊ शकलो आणि **एसएसआयचे** मर्यादित परिणाम समजावून सांगू शकलो.

युरोपियन संघराज्ये, **ईयू**, कडून भारतातील दहा राज्यांमध्ये रोजगार निर्मिती आणि व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण यांच्या संयुक्त प्रकल्पासाठी मान्यता.

